# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/01/2023 (मंगळवार) दुपार

---

## विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा :–** दिनांक २२/०१/२०२३ चे २३.३० वा. ते २३.५५ वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय ३६ वर्ष व आरोपी नामे– राजु पुंडलिक चौरे, वय ३६ वर्ष, रा. रामठी हे सख्खे चुलत नातेवाईक असुन एकाच मोहल्ल्यात राहतात आरोपी हा दारू पिण्याच्या सवईचा असुन यांच्यात जुने वाद आहे. नमुद घटना तारखेला फिर्यादी ही तिच्या घराच्या वरच्या रूममध्ये तिचे मुलीसह झोपली असताना आरोपी हा दिवाकर पेठे हयाच्या घरावर चढुन फिर्यादीच्या घराच्या वरच्या रूममध्ये आला. तेव्हा तो दारूचे नशेत होता फिर्यादीने त्यास अचानक तिचे रूममध्ये पाहील्याने त्यास विचारले की ''तु माझ्या घरात रूममध्ये काय करत आहे'' तेव्हा त्याने फिर्यादीचे अंगावर धावुन शिवीगाळ करून फिर्यादी याचा हात पकडुन विनंयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ४५२, ५०६ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस हवालदार ललीता बन्सोड ब. नं. १२९१ मो. कं. ७४९९७३६२२४ या करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. कुही :–** अंतर्गत २७ कि.मी. अंतरावरील मौजा निंबा शिवार येथे दिनांक २२/०१/२०२३ चे १७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– ईश्वर पुरूषोत्तम रोकडे वय ३१ वर्ष रा. खापरी रेल्वे व आरोपी नामे– सचिन सुर्यभान फटींग रा. पाचगाव हे चांगले मित्र असुन फिर्यादीने आरोपीला १० लाख रू. उसने दिले होते. यातील घटना तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीला यातील आरोपीने पैसे घेवुन जाण्याकरीता नमुद घटनास्थळावर बोलाविले असता ''मी तुझे पैसे देत नाही'' असे म्हणुन आरोपीने धारदार वस्तु हातात घेवुन फिर्यादीचे पाठीवर व उजव्या हाताचे मनगटावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १५८९ संजय कुलकर्णी मो. नं.९४२२८१८०६२ या करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील ईतवारी पेठ दत्त मंदीर जवळ उमरेड येथे दिनांक २३/०१/२०२३ चे १३.३० वा. ते १३.५० वा. दरम्यान फिर्यादी नामे— निलंकठ बाळकृष्ण सहारकर वय ४० रा ईतवारी पेठ उमरेड हा आरोपी नामे— मनोज बाळकृष्ण सहारकर वय ४० रा ईतवारी पेठ उमरेड याचा सख्खा भाऊ आहे व दोन्ही वेगवेगळे राहतात व आरोपीजवळ आई राहत असता त्याने ७ दिवसा पुर्वी आईला घराबाहेर काढले. नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा आरोपीचे घरी आपल्या आईला भेटण्यास गेला असता फिर्यादीने आरोपीस विचारले की ‘‘आई कोठे आहे’’ तेव्हा आरोपी म्हणाला की मला माहीत नाही फिर्यादीने आरोपीस म्हटले की ‘‘तु आईला घराबाहेर का काढले’’ असे विचारले असता यातील आरोपीने घरात जावुन चाकु आणुन फिर्यादीचे डाव्या पायाच्या पोटरीवर व डाव्या हाताच्या मधल्या तिनही बोटावर मारून जखमी केले व पुन्हा ईकडे आल्यास जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गणेश गिरडकर ब. नं ५० पोस्टे उमरेड ७४४७३५५७४९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**